पुणे महानगरपालिका

**✻ स्थायी समिती ✻**

कार्यपत्रिका क्रमांक २९

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **बुधवार दि. ३/१०/२००७** रोजी सकाळी ११:३०(साडे अकरा) वाजता **म.ज्योतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**दाखल विषय**

**विषय क्र. ८४७**

मा.सुनिल बनकर व मा.संदिप लडकत यांचे दि.३/१०/२००७ चे पत्र.

स्थायी समिती ठ.क्रं.७३८,दि.१८/९/२००७ चा फेरविचार करण्यात यावा. (पुणे मनपा परिवहन उपक्रमाच्या सेवकांना महागाई भत्त्याचा फरक देणेसाठी व इतर तातडीच्या खर्चासाठी द्यावयाच्या र.रुपये ५ कोटी पैकी र.रुपये ३ कोटी सेवकांना महागाईभत्ता फरक देणेस व र.रु.२ कोटी इतर तातडीच्या कामासाठी खर्च करणेबाबत)

**विषय क्र. ८४८**

मा.सुनिल बनकर व मा.सौ.अलका खाडे यांचे दि. ३/१०/२००७ चे पत्र.

वडगांव शेरी शाळा क्र. २०२ बी व ९९ जी येथे वर्गखोल्या बांधणे व कंपाऊंड बांधणेकरीता र.रुपये ३० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, भांडवली कामे, २. प्राथमिक शिक्षण, पान क्र. १३०, अ.क्र. १३९ शहरात विविध ठिकाणी प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र. एस-२३), पान क्र. २७४, अ.क्र. ३०, बोराटेवस्ती येथे शाळेच्या वर्गखोल्या बांधणे व कंपाऊंड करणे | ३० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वडगांव शेरी शाळा क्र. २०२ बी व ९९ जी येथे वर्गखोल्या बांधणे व कंपाऊंड बांधणे | --- | ३० लाख |

**विषय क्र. ८४९**

मा.सुनिल बनकर व मा.सौ.अलका खाडे यांचे दि. ३/१०/२००७ चे पत्र.

खराडी स.नं. ७/३/ब येथे हॉस्पिटल बांधणेकरीता र.रुपये ९० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, भांडवली कामे, २. प्राथमिक शिक्षण, पान क्र. १३०, अ.क्र. १३९ शहरात विविध ठिकाणी प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र. एस-२३), पान क्र. २७४, अ.क्र. ३२, आपले घर तुळजाभवानीनगर परिसरामध्ये शाळेच्या वर्गखोल्या बांधणे | ३५ लाख | --- |
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, भांडवली कामे, १२-भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १८०, अ.क्र. १५७, शहरात विविध ठिकाणी व्यायामशाळा बांधणे (यादी क्र. एस-१२), पान क्र. २७९, अ.क्र. २४, खराडी गावठाण येथे पोहोण्याचा तलाव बांधणे | ५५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| खराडी स.नं. ७/३/ब येथे हॉस्पिटल बांधणे | --- | ९० लाख |

**विषय क्र. ८५०**

मा.सुनिल बनकर व मा.सौ.अलका खाडे यांचे दि. ३/१०/२००७ चे पत्र.

महाराष्ट्राची लोककला लोकनाट्य (लावणी) ही कला परंपरेनुसार गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्रात रसिकांच्या सेवेसाठी रुजू आहे या कलेवर हजारो कलाकारांचे उदरनिर्वाह अवलंबून आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात जनतेमध्ये जागृतीसाठी व प्रबोधनासाठी या कलेचा फार मोठा उपयोग झालेला आहे.

बालगंधर्व रंगमंदिर व मनपाची अन्य नाट्यगृहे या कलेसाठी उपलब्ध होती. परंतू गेल्या अनेक महिन्यांपासून या कलेस मनपाने बंदी घातलेली आहे. त्यामुळे हजारो कलाकारांना बेरोजगारांची कुऱ्हाड कोसळली असून त्यांचेवर उपासमारीची वेळ आलेली आहे.

सबब येथून पुढे लावणी (लोकनाट्य) या कलेच्या कार्यक्रमांना मनपाची सर्व नाट्यगृहे त्वरीत उपलब्ध करुन देणेत यावे.

**विषय क्र. ८५१**

मा.सुनिल बनकर व मा.सौ.अलका खाडे यांचे दि. ३/१०/२००७ चे पत्र.

श्री.हर्षद कैलास बरबटे, सर्व्हेअर यांना पुणे मनपाकडे सर्व्हेअर या पदावर ६ महिन्याच्या कालावधीसाठी मानधनावर नेमण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्र. ८५२**

मा.सुनिल बनकर व मा.सौ.अलका खाडे यांचे दि. ३/१०/२००७ चे पत्र.

खालीलप्रमाणे विविध विकास कामांसाठी र.रुपये ९० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १६०, अ.क्र. २४६, दर्गा स.नं. ५४, ५९, ५८ डी.पी.रोड ३६ मीटर करणे | ९० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १) वॉर्ड क्र. ४० कोरेगांव पार्क संत गाडगेबाबा वस्ती येथे रस्ता कॉंक्रीट करणे | --- | १० लाख |
| २) येरवडा वॉर्ड ऑफीस येथे नविन इमारतीत सुधारणा कामे करणे (लिफ्ट बसविणे) | --- | ४० लाख |
| ३) बोपोडी येथील जलतरण तलावाचे उर्वरित कामासाठी | --- | २० लाख |
| ४) वॉर्ड क्र. १४ शांतीरक्षक मिरल सोसायटी व परिसरातील नागरिकांना पुरेसा पाणी पुरवठा करण्यासाठी एस.आर.बांधणेसाठी | --- | २० लाख |

**विषय क्र. ८५३**

मा.अनिल भोसले, सभागृह नेता, मा.शाम देशपांडे, मा.विकास मठकरी, विरोधी पक्षनेते व मा.रविंद्र धंगेकर यांचे दि. ३/१०/२००७ चे पत्र.

साहित्यिक कलावंत प्रतिष्ठान, पुणे संस्थेच्या वतीने दि. २१, २२ व २३ डिसेंबर २००७ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरुड, पुणे येथे ७ वे साहित्यिक कलावंत संमेलन आयोजित करण्यात आले आहे. नवोदित साहित्यिक व कलावंत यांना संमेलनाच्या माध्यमातून व्यासपीठ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. या संमेलनात अनेक मान्यवर साहित्यिक व कलावंत सहभागी होऊन मार्गदर्शन करतात. साहित्यिक कलावंत संमेलनाचे सहप्रायोजक पुणे महानगरपालिकेने स्विकारुन र.रुपये १० लाख सन २००७-०८ चे अंदाजपत्रकातील पान क्र. ४९, ३८ गावांतील डी.पी.मार्किंग करणे व एकत्र योजना करणे तसेच टाऊन प्लॅनिंग स्किम राबविणे / जुन्या हद्दीतील निवासी झोन या विकास आराखडा तयार करणे / नविन हद्दीतील गावांचा सिटी सर्व्हे करणे, आरई ११ सी १२४ या अंदाजपत्रक रक्कमेतून वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी

**विषय क्र. ८५४**

पुणे महानगरपालिकेच्या आयातकर खात्याच्या नियमावलीतील कलम २५(१) अन्वये स्पेक्ट लॅब., के.२/१ एरंडवणा को-ऑप सोसा., दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलसमोर, मेहंदळे गॅरेजजवळ, पुणे ४ यांना त्यांच्या दि. २४/९/२००७ च्या अर्जानुसार आयातकर खात्याकडील चालू खाते (करंट अकौंट) ची सुविधा मान्य करणेस तसेच मा.महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात नमूद केलेल्या अ.क्र. १ ते १८ अटींचे अधीन योग्य तो कायदेशीर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/आयातकर/४८६ दि. १/१०/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ८५५**

पुणे महानगरपालिकेच्या आयातकर खात्याच्या नियमावलीतील कलम २५(१) अन्वये वनाझ इंजिनिअर्स लि., ८५/१, पौड रोड, कोथरुड, पुणे ३८ यांना त्यांच्या दि. ३१/८/२००७ च्या अर्जानुसार आयातकर खात्याकडील चालू खाते (करंट अकौंट) ची सुविधा मान्य करणेस तसेच मा.महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात नमूद केलेल्या अ.क्र. १ ते १८ अटींचे अधीन योग्य तो कायदेशीर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/आयातकर/४८७ दि. १/१०/२००७ चे पत्र.

**शरद समेळ,**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**